V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

# सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री (धुळे)

## समाजशास्त्र विभाग

## कार्यशाळा अहवाल

दिनांक १७/०३/२०१७

सध्या रोजगार मिळविणे सगळयात मोठे आव्हान असल्यामुळे विद्यापीठांनी नव-नवीन अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री (धुळे) येथे एम.ए.प्रथम वर्ष अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा दिनांक १७/०३/२०१७ रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून साक्री येथील सि.गो. पाटील महाविद्यालयात एम.ए. समाजशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.ए.पी. खैरनार सर उमविचे अधिष्ठाता भाषा विभाग, प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे सर, अक्कल्कुवा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे सर, प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे सर, जळगाव येथील प्रा.डाॅ.जयश्री महाजन प्रा. डॉ.एल.जी.पाटील यांच्या हस्ते झाले.

प्राचार्य डॉ. खैरनार सर यांनी उद्घाटनपर संबोधनामध्ये राज्य, राष्ट्र व जागतिक पातळीवर आजच्या गरजा काय आहेत त्याचा विचार करून नवीन अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. सर्व अभ्यासक्रम जीवनाशी सुसंगत असले पाहिजे, अभ्यासक्रम तयार करताना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा किंवा नेट-सेट परीक्षांच्या धर्तीवर पुनर्रचना केली पाहिजे असे मत व्यक्त केले.

समाजशास्त्राचे तज्ञ मार्गदर्शक प्राचार्य डॉ.डी.एल. तोरवणे सर यांनी सर्वप्रथम विद्यार्थी स्वावलंबी बनतील असे अभ्यासक्रम तयार झाले पाहिजे असा आशावाद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे सर यांनी नवीन अभ्यासक्रमाची पुनर्रचना समाज सजग बनविण्यासाठी झाला पाहिजे, विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होणारा अभ्यासक्रम तयार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

Scanned by CamScanner

या कार्यशाळेचे चार सत्रामध्ये आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्र उद्घाटन समारंभ, द्वितीय सत्रात ११.०० ते १.०० या वेळेत अभ्यासक्रमाबाबत प्राचार्य डॉ.डी.एल. तोरवणे सर यांचे मार्गदर्शन व गट चर्चा करण्यात आली. तृतीय सत्रात २.००ते ४.०० या कालावधीत विषय निवडीबाबत चर्चा करून नवीन अभ्यासक्रमाला अंतिम रूप देण्यात आले. चतुर्थ सत्रात ४.३० ते ५.३० या दरम्यान समारोपपर मार्गदर्शन प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे व प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे सर यांनी केले. या कार्यशाळेसाठी उमवि अंतर्गत एम जे कॉलेज जळगाव, नूतन मराठा महाविद्यालय जळगाव, उमवि विद्यापीठ तसेच सि.गो. पाटील महाविद्यालयातील 10 प्राध्यापक सहभागी झाले होते.

या संपूर्ण कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.एल.जी.पाटील यांनी कार्य पार पाडले.

समन्वयक
प्रा.डॉ.एल.जी.पाटील
समाजशास्त्र विभाग प्रमुख

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

प्राचार्य / Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule

Scanned by CamScanner

V.V.M.'s S.G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

V.V.M's S.G.Patil Arts, Science & Commerce College Sakri (Dhule)

**Restructuring of Syllabus for M.A. Part-I in Sociology**

17th March 2016

***Registration***

| Sr. No. | Name of Teacher | Name of College | Signature |
|---|---|---|---|
| 1 | DEELIP RAJARAM CHAVAN | IDMYP's ASC COLLEGE JALGAON | [signature] |
| 2 | SAHEB VIRBHADRARAO PADALWAR | —— " —— | [signature] |
| 3 | Dr. Jayashri Tulshiram Mahajan | M.J. College Jalgaon | [signature] |
| 4 | Sagar Loknath Badge | —— " —— | [signature] |
| 5 | Kanchan Hilal Desale | —— " —— | [signature] |
| 6 | Dr. Prashant Vishnu Sonwane | North Maharashtra University, Jalgaon | [signature] |
| 7 | Dr. Dattatraya Ravan Admane | North Maharashtra University, Jalgaon | [signature] |
| 8 | Dr. L.G. Patil S.G. Patil college Sakri | S.G. Patil College Sakri Dhule | [signature] |
| 9 | Prof. A. B. Deore | S.G. Patil college Sakri Dhule | [signature] |
| 10 | Dr. D. L. Torwane | S.G. Patil college Sakri | [signature] |
| | | | |
| | | | |

V.V.M.'s S.G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.


[signature]
Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Scanned by CamScanner

V.M.S's S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

आपला महाराष्ट्र
सोमवार २० मार्च २०१७

# रोजगारचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून अभ्यासाची पुर्नरचना करा : खैरनार



साक्री महाविद्यालयात एम. ए. समाजशास्त्र अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. ए. पी.खैरनार, प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्राचार्य डॉ. ए. एस. पैठणे आदी.

**साक्री – सध्या रोजगार मिळविणे सगळयात मोठे आव्हान म्हटले जाते, म्हणुन विद्यापीठांनी नव – नवीन अभ्यासक्रमांची पुर्नरचना करतांना जे विद्यार्थी पदवी घेवून बाहेर पडतील तेंव्हा त्यांनी अभ्यासलेल्या अभ्यासक्रमांमुळे लवकर रोजगार कसा उपलब्ध होईल? हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवुन नवीन अभ्यासक्रमांची पुर्नरचना केली पाहिजे असे मत उमविचे ललीत कला विद्याशाखेचे संयोजक व निजामपुर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. खैरनार यांनी व्यक्त केले.**

साक्री येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात एम.ए.समाज शास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रम पुर्नरचना कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. ए. पी. खैरनार, उमविचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे, अक्कलकुवा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. पैठणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, जळगांव येथील प्रा. डॉ. जयश्री महाजन, प्रा. डॉ. एल. जी. पाटील यांच्या हस्ते झाले.

प्राचार्य खैरनार पुढे म्हणाले की दैनंदिन शिकविले जाणारे अभ्यासक्रम तयार करतांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा किंवा नेट-सेट परिक्षांच्या धर्तीवर पुर्नरचना केली पाहिजे. राज्य, राष्ट्र व जागतीक पातळीवर आजच्या गरजा काय आहेत त्यांचा विचार करून नवीन अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. सर्व अभ्यासक्रम जिवनाशी सुसंगत असले पाहिजे, सध्या विद्यार्थी परिक्षेत पास होण्यासाठी शिकतात मात्र जिवन सार्थकी लागण्यासाठी शिकत नसल्याची खंत खैरनार यांनी व्यक्त केली.

समाजशास्त्राचे तज्ञ मार्गदर्शक प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे यांनी अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांऐजवी परीक्षा पध्दतींमध्येच जास्त बदल होत असतात, म्हणुन सर्वप्रथम विद्यार्थी स्वावलंबी बनतील असे आभ्यासकम तयार झाले पाहिजेत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या मुल्पमापनाच्या पध्दतींमध्ये बदल होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे गुणांचा विचार झाला पाहिजे. शिक्षणामध्ये बदल घडवुन आणण्याची तक्द आहे, म्हणुन चांगले आभ्यासक्रम शिकविणे महत्त्वाचे असल्याचे मार्गदर्शन डॉ.तोरवणे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी नवीन अभ्यासक्रमांची पुर्नरचना समाज सजक बनविण्यासाठी झाली पाहिजे त्यासाठी विद्यार्थामध्ये गोडी निर्माण होणार आभ्यासक्रम तयार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय बच्छाव व आभार प्रा. डॉ. एल. जी. पाटील यांनी मानले.

Scanned by CamScanner

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College,
SAKRI,
Dist.Dhule


लोकमत धुळे, सोमवार, दि. २० मार्च २०१७

# रोजगाराभिमुख अभ्यासक्रम हवे

## ए. पी. खैरनार : सी. गो. पाटील महाविद्यालयात कार्यशाळा

साक्री : सध्या रोजगार मिळविणे सगळ्यात मोठे आव्हान म्हटले जाते. म्हणून विद्यापीठांनी नवनवीन अभ्यासक्रमांची पुनर्रचना करताना जे विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतील. तेव्हा त्यांनी अभ्यासलेल्या अभ्यासक्रमांमुळे त्यांना लवकर रोजगार कसा उपलब्ध होईल? हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन नवीन अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली पाहिजे, असे प्रतिपादन ललित कला विद्याशाखेचे, संयोजक व निजामपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. खैरनार यांनी येथे केले.

साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात एम. ए. समाजशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी उमविचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे, अक्कलकुवा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. पैठणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्रा. डॉ. जयश्री महाजन, प्रा. डॉ. एल. जी. पाटील उपस्थित होते.




मार्गदर्शन करताना डॉ. ए. पी. खैरनार. सोबत प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे, डॉ. ए. एस. पैठणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्रा. डॉ. जयश्री महाजन.

◆ डॉ. तोरवणे म्हणाले, की अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमाऐवजी परीक्षा पद्धतीमध्येच जास्त बदल होत असतात, म्हणून सर्वप्रथम विद्यार्थी स्वावलंबी बनतील असे अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या मूल्यमापनाच्या पद्धतीमध्ये बदल होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे गुणांचा विचार झाला पाहिजे.

प्राचार्य डॉ. खैरनार पुढे म्हणाले, की दैनंदिन शिकविले जाणारे अभ्यासक्रम तयार करताना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा किंवा नेट-सेट परीक्षांच्या धर्तीवर पुनर्रचना केली पाहिजे. राज्य, राष्ट्र व जागतिक पातळीवर आजच्या गरजा काय आहेत? त्यांचा विचार करून नवीन अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. सर्व अभ्यासक्रम जीवनाशी सुसंगत असले पाहिजे. सध्या परीक्षेत पास होण्यासाठी शिकतात. मात्र, जीवन सार्थकी लागण्यासाठी शिकत नसल्याची खंत खैरनार यांनी व्यक्त केली.

Scanned by CamScanner